मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

जाहीर निवेदन

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई ने दि.02/12/2016 रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी मौजे कोन,ता. पनवेल, जि.रायगड येथे बांधलेल्या 2417 सदनिकांचे गिरणी कामगारांना / त्यांच्या वारसाला सदनिका वितरण करण्यासाठी सोडत काढली होती.

तथापि याबाबत काही गिरणी कामगार संघटनांनी शासनाकडे अशी मागणी केली होती की, **'ज्या गिरण्यांचा वाटा निश्चित झाला आहे किंवा जमिन प्राप्त झाल्यावर बांधकाम सुरु झाले आहे किंवा भविष्यात बांधकाम सुरु होईल'** अशा गिरण्यांमधील जे गिरणी कामगार किंवा त्यांचे वारस वरील नमूद सोडतीमध्ये यशस्वी झाले आहेत, अशा सर्व कामगारांची नावे कोण गाव पनवेल येथील घराकरिता काढण्यात आलेल्या लॉटरी मधून रद्द करून त्यांची नावे त्यांच्या गिरणीच्या जागेवर होत असलेल्या अथवा होणारया घराच्या लॉटरी मध्ये प्राधान्याने समाविष्ट करण्यात यावी.

सदरच्या मागणीप्रमाणे **उच्च स्तरीय समितीने** मौजे.कोन, ता. पनवेल येथिल 2417 यशस्वी गिरणी कामगारांना / त्यांच्या वारसांना सदरहू सदनिका नको असल्यास त्यांची नावे एमएमआरडीएच्या सदर सोडतीच्या यादीतून रदद करुन त्यांना त्यांच्या गिरण्यांच्या जागेवर होत असलेल्या अथवा होणार असलेल्या घरांच्या लॉटरीमध्ये भाग घेण्याचा विकल्प (म्हाडाने तयार केलेल्या नमुन्यात) देण्यात यावा. " असे निर्देश दिले आहेत.

म्हाडाने तयार केलेला विकल्प नमुन्यातील सारांश पुढील प्रमाणे --------

विकल्प -1 दि.02/12/2016 च्या सोडतीमध्ये यशस्वी झालेले गिरणी कामगार/ वारस जे मौजे कोन, ता. पनवेल येथिल सदनिका घेण्यास इच्छुक आहेत. त्यांची पात्रता निश्चित करुन सदनिका वितरणाची कार्यवाही केली जाईल.

विकल्प -2 दि.02/12/2016 रोजीच्या सोडतीमध्ये यशस्वी झालेले गिरणी कामगार / वारसदार मुळ गिरणी कामगार ज्या गिरणीमध्ये कामाला होते त्याच गिरणीच्या जमिनीवर बांधलेल्या सदनिकांसाठी भविष्यात जेव्हा कधी सोडत काढण्यात येईल, त्या सोडतीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करण्यात यावे. विकल्प-2 भरून दिल्यास मौजे कोन, ता. पनवेल, जि. रायगड येथील आता मिळालेल्या सदनिकेवर त्यांचा कोणताही हक्क राहाणार

नाही किंवा त्याबाबत गिरणी कामगार/ वारसदार कोणताही दावा करणार नाही.तसेच त्यांना लागलेल्या सदनिकेसाठी प्रतिक्षा यादीवरील पुढील अर्जदारास संधी देण्यास त्यांची काहीही हरकत राहणार नाही." असे नमूद आहे.

सदर सोडतीमधील यशस्वी अर्जदारांना याव्दारे निवेदन करण्यात येते की, मंडळाने काढलेल्या सोडतीमधील यशस्वी अर्जदारांनी शासनाच्या निर्देशानुसार सोबत दिलेल्या दोन विकल्पांच्या नमुन्यांपैकी स्वेच्छेनुसार कोणताही एक विकल्प उपमुख्य अधिकारी / धापुप्र /गिरणी कामगार कक्ष, यांचे कार्यालय, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कक्ष क्र 205 येथे समक्ष हजर राहून व ओळख पटवून सादर करणे बंधनकारक आहे.

सदर विकल्प देताना त्याबाबत दिलेल्या सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात . एकदा सादर करण्यात आलेल्या विकल्पामध्ये कोणतेही बदल करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही /-

उपमुख्य अधिकारी/ धापुप्र/ गिरणी कक्ष
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई

विकल्प देण्यापूर्वी खालील प्रमाणे सूचना अवश्य वाचाव्यात.

(१) * येथे गिरणी कामगार किंवा त्याच्या पश्चात त्याच्या वारसाने विकल्प क्रमांक १ (एक) किंवा विकल्प क्रमांक २ (दोन) यापैकी कोणत्याही एका पर्यायाचा विकल्प क्रमांक स्पष्ट पणे नमूद करणे आवश्यक आहे . दोन्ही पैकी कोणताही विकल्प न दिल्याक किंवा दोन्ही विकल्प दिल्यास आपणास मौजे कोण , ता.पनवेल येथे लागलेली सदनिका पसंद आहे असे समजण्यात येईल.

(२) (xx) लागू नाही ते खोडावे.

(३) गिरणी कामगार जो विकल्प स्वीकारणार आहेत त्याचा विकल्प क्रमांकातील मजकूर भरावा . इतर विकाल्पातील मजकूर भरण्याची आवश्यकता नाही .

(४) मयत गिरणी कामगाराच्या बाबतीत एकापेक्षा अधिक वारसांनी अर्ज करून दोन वेगवेगळे विकल्प दिल्यास जो अर्ज प्रथम प्राप्त होईल त्याचा विचार करण्यात येईल .

(५) गिरणी कामगारंनी / वारसांनी दोन वेगवेगळे अर्ज करून त्यामध्ये वेगवेगळे विकल्प दिल्यास जो अर्ज प्रथम प्राप्त होईल त्याचा विचार करण्यात येईल .

(६) सदर विकल्प अर्ज भरून देणे अनिवार्य असल्याने सर्व यशस्वी गिरणी कामगार / वारसांनी त्वरित विकल्प भरून द्यावे, जेणेकरून आपल्या पसंती नुसार पुढील कार्यवाही नियमानुसार करणे शक्य होईल . विकल्प विहित वेळेत प्राप्त न झाल्यास आपला विचार फक्त मौजे कोण ,ता .पनवेल येथील सदनिकेसाठी करण्यात येईल .

(७) खालील प्रमाणे गिरण्यांची जमीन म्हाडाला मिळणार नाही . कृपया याची नोंद घ्यावी.

अ .क्र.	गिरणीचे नाव	अ .क्र .	गिरणीचे नाव
१	मॉडन मिल	६	कोहिनूर मिल नं -२ (एन .टी .सी .)
२	कमला मिल	७	पोद्दार मिल (एन .टी .सी .)
३	खटाव मिल	८	मफतलाल मिल नं -१
४	फिनिक्स मिल	९	मफतलाल मिल नं -२
५	कोहिनूर मिल नं -१ (एन .टी .सी .)	१०	मुकेश टेक्सटाईल मिल

(८) सदर विकल्प अर्ज दिनांक 30/07/2018 पर्यंत उपमुख्य अधिकारी / धापुप्र / गिरणी, कक्ष क्रमांक २०५, पहिला मजला , गृहनिर्माण भवन ,कलानगर ,वांद्रे (पूर्व),मुंबई -४०००५१ या ठिकाणी देण्यात यावा व छापील पोच पावती घ्यावी .

<u>पोच पावती</u>

आज दिनांक---------------------- रोजी ---------------------- वाजता

गिरणी कामगार / वारस श्री /श्रीमती --

मोबाईल नं ------------------------------ यांचे कडून विकल्प अर्ज मिळाला याबाबतची नोंद उपमुख्य अधिकारी / धापुप्र / गिरणी कक्ष / मुंबई मंडळ, म्हाडा,मुंबई यांच्या कार्यालयातील रजिस्टर मध्ये अनुक्रमांक ----------------- वर नोंद घेण्यात आली .

विकल्प सादर करणेबाबत

MMRDA-1/2016 च्या मौजे कोन, ता.पनवेल, जिल्हा रायगड येथील सदनिकांच्या दि.02/12/2016 रोजीच्या सोडतीतील यशस्वी गिरणी कामगार / वारस यांना सदनिका वितरणाबाबत दयावयाचे विकल्प

मी प्रतिज्ञार्थी नावे श्री---/श्रीमती/ गिरणी कामगार श्री / श्रीमती गिरणी कामगाराचे नाव ----------------------------------हे (गिरणीचे नाव) -------------------------------- ---या गिरणीमध्ये गिरणी कामगार म्हणुन कार्यरत होते. मी स्वत: मुळ गिरणी कामगार आहे किंवा गिरणी कामगार यांचा ----------------------- (नाते) असुन माझे सध्या वास्तव्य (पत्ता)-- येथे आहे.

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी मौजे कोन (ता. पनवेल, जि. रायगड(येथे बांधलेल्या 2417 सदनिकांची संगणकीय सोडत दि.02/12/2016 रोजी काढण्यात आली.

सदर सोडतीमध्ये प्राधान्य क्र------. वर यशस्वी झालेले गिरणी कामगार श्री ----------------- यांचा अर्ज क्र--------------- हा सदनिका क्रं------. साठी पात्रता निश्चित करण्याच्या आधिन राहून यशस्वी ठरविण्यात आलेला आहे.

सदर सदनिकेच्या वितरणाबाबत मी खालील प्रमाणे विकल्प स्वखुशीने देत आहे.

विकल्प क्रमांक १ (एक)

दि .02/12/2016 रोजीच्या सोडतीमध्ये यशस्वी झाल्यानुसार मला प्राप्त झालेल्या प्रथम सुचना पत्र क्र---------------------------., दि--------------------. नुसार मी कोटक महिंद्रा बँकेच्या, -------------------------- या शाखेमध्ये दि-------------------. रोजी पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केली आहेत(xx)/ करणार(xx) आहे .

मला सोडतीमध्ये यशस्वी झालेली मौजे कोन, ता. पनवेल येथिल सदनिका क्र------------. घेण्यास मी इच्छुक आहे. तरी मला सदर सदनिका वितरणाची कार्यवाही करावी.

दिनांक :-
ठिकाण :-

स्वाक्षरी ---------------------------------
गिरणी कामगार किंवा गिरणी कामगार मयत असल्यास गिरणी कामगाराच्या वारसाचे नाव :-
---
पत्ता :-
भ्रमणध्वनी क्र. :-
ओळखपत्र क्र.

<u>किंवा</u>

विकल्प क्रमांक २ (दोन)

दि. 02/12/ 2016रोजीच्या सोडतीमध्ये यशस्वी झाल्यानुसार मला प्राप्त झालेल्या प्रथम सुचना पत्र क्र----------------------., दि-------------. नुसार मी कोटक महिंद्रा बँकेच्या, ----------- या शाखेमध्ये दि--------.-- रोजी पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केली आहेत(xx) / नाहीत(xx).

दि.02/12/2016 रोजी मौजे कोन (ता. पनवेल, जि. रायगड(येथील सदनिकासाठी काढलेल्या सोडतीमध्ये जरी मला सदनिका क्रमांक -------------- साठी यशस्वी घोषित केले असले तरी मला या सदनिकेमध्ये स्वारस्य नाही.

सबब मला मिळालेल्या या सदनिकेतील हक्क मी सोडत आहे व मूळ गिरणी कामगार ज्या गिरणीमध्ये कामाला होते त्याच गिरणीच्या जमिनीवर बांधलेल्या सदनिकांसाठी भविष्यात जेंव्हा कधी सोडत काढण्यात येईल, त्या सोडतीमध्ये भाग घेण्यासाठी मला पात्र समजण्यात यावे.

मूळ गिरणीच्या जागे वरील सदनिकेसाठी भविष्यात होणाया- सोडतीमध्ये मी जर अयशस्वी झालो तरीही मी मौजे कोन, ता. पनवेल, जि. रायगड येथील आता मिळालेल्या सदनिकेवर कोणताही हक्क ठेवणार नाही किंवा त्याबाबत मी कोणताही दावा करणार नाही.

तसेच मला लागलेल्या सदनिकेसाठी प्रतिक्षा यादीवरील अर्जदारास संधी देण्यास माझी हरकत राहणार नाही.

दिनांक :- **स्वाक्षरी --------------------------------**
ठिकाण :- **गिरणी कामगार किंवा गिरणी कामगार मयत असल्यास गिरणी कामगाराच्या वारसाचे नाव :-**

--

पत्ता :-
भ्रमणध्वनी क्र. :-
ओळखपत्र क्र.

उपरोक्त नमुद केलेला विकल्प क्रंमाक *नुसार_______________ माझी संमती असल्याचे गृहित धरुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावीयाबाबत. भविष्यात माझ्याकडुन किंवा माझ्या वारसाकडून कोणतीही तक्रारआक्षेप/ / दावा करण्यात येणार नाही, याची खात्री मी देत आहे. मी दिलेला उपरोक्त विकल्प क्रमांक माझ्या कुटुंबातील सर्व व्यक्तीस लागु राहील.

दिनांक :- **स्वाक्षरी ---------------------------------**
ठिकाण :- **गिरणी कामगार किंवा गिरणी कामगार मयत असल्यास गिरणी कामगाराच्या वारसाचे नाव :-**

--

पत्ता :-
भ्रमणध्वनी क्र. :-
ओळखपत्र क्र.

https://www.scribd.com/document/382851315/Mill-Lottery-Notice-Cum-Vikalp-Form-Final

https://bit.ly/2N6odCt

कोन पनवेल येथील सोडतीत यशस्वी गिरणी कामगारांना गिरणीच्या जमिनीवर घर पाहिजे असल्यास विकल्प अर्ज भरून देणे आवश्यक आहे . कृपया याबाबतचे जाहीर निवेदन **https://bit.ly/2N6odCt** या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. कृपया सर्व यशस्वी गिरणी कामगार / वारस यांना आपल्या स्तरावर सूचित करावे. **Dy CO/Mill/ DRP /MB**